## महाविद्यालयाची प्रमुख वैशिष्ट्ये

1) संस्थेच्या प्रयत्नामुळे भव्य इमारत व रम्य परिसर.
२) व्यक्तिमत्व विकास उत्कृष्ट निकालासाठी वैयक्तिक लक्ष व ज्यादा तासिकांची सोय.
३) विद्यार्थ्यासाठी संगणक (कॉम्प्युटर) प्रशिक्षणाची सोय.
४) विस्तीर्ण क्रीडा मैदान, वैयक्तिक, मैदानी व सांघिक खेळाची सोय व मार्गदर्शन.
५) महाविद्यालयाचे समृध्द ग्रंथालय व सुसज्ज प्रयोगशाळा.
६) आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना मोफत पुस्तकांची व अभ्यासिकेची सोय.
७) अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापक.
८) इयत्ता १२वी विद्यार्थ्यांची जास्तीत जास्त तयारी करून घेण्यासाठी अंतर्गत चाचणी व सराव परीक्षा, टेस्ट ट्युटोरियल्स घेतल्या जातात.
९) जिल्हा, राज्य व राष्ट्र पातळीपर्यंत खेळाडूंचा विविध क्रीडा स्पर्धेत सहभाग.
१०) दरवर्षी सहलीचे आयोजन केले जाते.
११) प्रत्येक वर्षी वर्षाच्या सुरुवातीस व शेवटी शिक्षक व पालक मेळावा आयोजित केला जातो

## महाविद्यालयाची ध्येये

- खुलताबाद तालुक्यात नाविण्यपूर्ण महाविद्यालय म्हणून पुढे येणे.
- गुणांपेक्षा गुणवत्तेला प्राधान्य देणे.
- राष्ट्रीय स्तरावर क्रिडा क्षेत्रात महाविद्यालयातील विद्यार्थी आपला ठसा उमटवतील असा प्रयत्न करणे.
- विद्यार्थ्यांचा सर्वांगिण व्यक्तिमत्व विकास साधण्यासाठी विविध उपक्रमांची योजना आखणे.
- वाणिज्य, व्यवसाय, कौशल्य शिक्षणाचे महत्व ग्रामीण भागात बिंबवणे इत्यादी.

देणगी मुल्य - १००/-

साई सेवा बहुविध प्रतिष्ठाण संचलित
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद संलग्न

# राजमाता जिजाऊ वरिष्ठ महाविद्यालय
# राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालय
## (कला, वाणिज्य व विज्ञान)

घोडेगांव, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद.
ई-मेल : rjscg18@gmail.com

## माहिती पुस्तिका
सन २०२२- २०२३

## वर्ष २०२१- २०२२ मधील विविध उपक्रम




# गुणवंत विद्यार्थी

## सद्गुरु जनेश्वर माध्यमिक विद्यालय,

घोडेगांव, ता.खुलताबाद, जि. औरंगाबाद.

### १० वी प्रथम, द्वितीय, तृतीय असलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन



| कु. अंजली संतोष आवारे | कु. शुभांगी अशोक गोल्हार | कु. साक्षी गजानन जाधव | कु. पायल सुरेश गोरे | कु. अंजली कडुबा चव्हाण |
|---|---|---|---|---|
| 91.20% | 90.50% | 90.50% | 89.20% | 89.20% |

## राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालय

### १२ वी (कला) शाखेत प्रथम, द्वितीय, तृतीय असलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन

| प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक | चौथा क्रमांक | पाचवा क्रमांक |
|---|---|---|---|---|



| चव्हाण अभिषेक भिका | जाधव निकीता सोमीनाथ | रहाणे पुजा विलास | जिते विशाल राजेंद्र | अधाने अभिषेक अशोक |
|---|---|---|---|---|
| 447 / 600 | 439 / 600 | 429 / 600 | 426 / 600 | 425 / 600 |
| 74.50% | 73.17% | 71.50% | 71.00% | 70.83% |

### १२ वी (विज्ञान) शाखेत प्रथम, द्वितीय, तृतीय असलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन

| प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक |
|---|---|---|---|---|



| तागड वैष्णवी शिवाजी | शिरभैये नुतन राजेंद्र | अजिंक्य पोपट खंडागळे | चव्हाण ऋषीकेश नामदेव | हिवर्डे भाग्यश्री रावसाहेब |
|---|---|---|---|---|
| 501 / 600 | 495 / 600 | 488 / 600 | 479 / 600 | 471 / 600 |
| 83.50% | 82.50% | 81.33% | 79.83% | 78.50% |

साई सेवा बुहविध प्रतिष्ठाण घोडेगांव ता. खुलताबाद जि. औरंगाबाद.

## संस्थेची ओळख

21 शतक माहिती तंत्रज्ञानाचे युग समजले गेले आणि अशा बदलत्या आधुनिक युगात शिक्षणाचे महत्व ओळखून मा.साईनाथ पाटील जाधव यांनी साईसेवा बहुविध प्रतिष्ठान घोडेगांव संस्थेची स्थापना केली.

शीलवान, कतृत्वशाली, उद्योगी तरुणांवर राष्ट्रांची उन्नती अवलंबून आहे हे ओळखून ज्ञान, शौर्य आणि ऐश्वर्य यांनी आपल्या भारत देशाला जगाच्या अग्रभागी पोहोचविण्यासाठी सर्वोत्कृष्ट तेचा ध्यास घेऊन सन 1994 साली सद्‌गुरु जनेश्वर माध्यमिक विद्यालयाची स्थापना करण्यात आली. या शाळेच्या माध्यमातून घोडेगांव व पंचक्रोशीतील गावातील मुलांमुलींना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षणाची सोय झाली याचे व्यवस्थापन यशस्वी राबवून ग्रामीण भाग असणाऱ्या घोडेगाव परिसरातील मुला-मुलींना बारावी पर्यंतचे शिक्षण मिळावे या ध्यासातून सन 2008 मध्ये राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालयाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील मुलां-मुलींना शिक्षण घेणे शक्य होऊ लागले मात्र पुढील पदवी पर्यंतचे शिक्षण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घेता यावे म्हणून संस्थेने पुढचे पाऊल उचलून संस्थेने सन 2019 साली राजमाता जिजाऊ वरिष्ठ महाविद्यालयाची स्थापना केली संस्थेने स्वतःच्या भव्य इमारतीत व निसर्गरम्य वातावरणात शैक्षणिक प्रगतीला सुरवात केली हाती घेतलेल्या कार्यात एकाग्रता असली म्हणजे यश हमखास मिळते हाच बोध घेऊन अज्ञानाचा अंधकार दुर करण्यासाठी संस्थेने माध्यमिक शिक्षणापासून पदवीपर्यंतचे शिक्षण ग्रामीण परिस्थितीचा विचार करुन एकाच छताखाली देण्याचे ठरविले व सद्यस्थितीत सर्व सुविधासह शाळा, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय गुणवत्तापूर्ण विकास साधन्याचा प्रयत्न सातत्याने करत आहे.

**राजमाता जिजाऊ वरिष्ठ महाविद्यालयाच्या परिसरात**
**सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक स्वागत**



# राजमाता जिजाऊ वरिष्ठ महाविद्यालय

## कला (BA)
## प्रथम / द्वितीय / तृतीय वर्ष

वरिष्ठ महाविद्यालयात खालील प्रमाणे विषय शिकविण्यात येतात त्यापैकी विषयाची निवड करावी.

अनिवार्य विषय : 1) इंग्रजी (प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष)
2) पर्यावरण (द्वितीय वर्ष) 3) संगणक (प्रथम वर्ष)

खालील पैकी एका विषयाची निवड करावी.
1) मराठी 2) हिंदी 3) ऊर्दू

## ऐच्छिक विषय

खालील पैकी एका गटातून एक याप्रमाणे विद्यार्थ्याने कोणतेही तीन ऐच्छिक विषय निवडावेत.

| | | |
|---|---|---|
| अ गट | - | इंग्रजी / मराठी / हिंदी / ऊर्दू |
| ब गट | - | मानसशास्त्र / भूगोल / गृहविज्ञान / शारीरिक शिक्षण / सरंक्षणशास्त्र / तत्त्वज्ञान |
| क गट | - | राज्यशास्त्र / समाजशास्त्र / इतिहास / अर्थशास्त्र / लोकप्रसासन |

## बी.कॉम प्रथम

### B.Com. F.Y. (Semester Pattern)

| Sr. No. | First Semester | Theory | + | Practical |
|---|---|---|---|---|
| 1 | English (Comp.) | 30 | + | 20 |
| 2 | Marathi / Hindi / Urdu (Second Language) | 30 | + | 20 |
| 3 | Business Statistics | 30 | + | 20 |
| 4 | Financial Accounting | 30 | + | 20 |
| 5 | Business Environment | 30 | + | 20 |
| 6 | Business Economics | 30 | + | 20 |
| 7 | I.T. Application in Business - I | 30 | + | 20 |

| Sr. No. | Second Semester | Theory | + | Practical |
|---|---|---|---|---|
| 1 | English (Comp.) | 30 | + | 20 |
| 2 | Marathi / Hindi (Second Language) | 30 | + | 20 |
| 3 | Business Mathematics | 30 | + | 20 |
| 4 | Financial Accounting | 30 | + | 20 |
| 5 | Business Entrepreneurship | 30 | + | 20 |
| 6 | Industrial Economics | 30 | + | 20 |
| 7 | I.T. Application in Business - II | 30 | + | 20 |

**B Com Second Year (Semester Pattern)**

**Third Semester**

1. English
2. Hindi (SL)
3. Marathi (SL)
4. Information Technology & Application in Business -III
5. Principal of Business Management
6. Corporate accounting - I
7. Business regulatory Frame Work
8. Marketing Management

**Fourth Semester**

1. English
2. Hindi (SL)
3. Marathi (SL)
4. Information Technology & Application in Business - IV
5. Organizational Behavior
6. Corporate accounting - II
7. Corporate legal frame work
8. Marketing Management

**B Com Third Year (Semester Pattern)**
**As Per Univercity Rule**



## बी.एस्सी प्रथम / द्वितीय / तृतीय वर्ष

विज्ञान शाखेच्या बी.एस्सी.प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी खालील विषयांची निवड करावी.

**अ) आवश्यक विषय :**

**1) इंग्रजी**

**2) दुसरी भाषा : मराठी / हिंदी (दुसरी भाषा प्रथम आणि द्वितीय वर्षासाठीच आहे.**

**आ) ऐच्छिक विषय :**

**खालील विषय गटापैकी कोणताही एक विषय गट निवडावा.**

1 Physics Electronics, Computer Science

2 Physics Chemistry, Computer Science

3 Physics, Chemistry, Electronics

4 Physics, Chemistry, Mathematics

5 Physics, Mathematics, Electronics

6 Chemistry, Botany, Zoology

7 Chemistry, Botany, Microbiology

8 Chemistry, Zoology, Env. Science

**टिप : बी.एस्सी. प्रथम वर्षाला घेतलेले आवश्यक व ऐच्छिक विषय बी.एस्सी द्वितीय वर्षाला सुध्दा तेच राहतील बी.एस्सी. तृतीय वर्षाला मात्र पूर्वी घेतलेले तीन ऐच्छिक विषयच राहतील.**

# शिष्यवृत्ती संदर्भात नियमावली

1 मागासवर्गीय विद्यार्थ्यांना संबंधित शिष्यवृत्तीचे अर्ज दिलेल्या वेळेत ऑनलाईन पध्दतीने अचूक भरून सदरअर्जाची प्रिंट सर्व कागदपत्रांसह कार्यालयात दिलेल्या मुदतीत जमा करावी. उशीरा येणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

2 उपलब्ध फी सवलत व शिष्यवृत्या :

1) भारत सराकर शिष्यवृत्ती (SC, NT, SBC, VJ/NT, OBC)

2) फ्रीशीप (SC, NT, SBC, VJ/NT, OBC)

3) अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती सुविधा उपलब्ध आहे.

4) एका वेळी एकच शिष्यवृत्ती घेता येईल.

## शिष्यवृत्ती फॉर्म पूर्ण करण्यासाठी खालील कागदपत्रांची पूर्तता करावी.

1 मुळ उत्पन्नाचा दाखला (तहसिलदार यांचा)

2 जातीच्या दाखल्याची सत्यप्रत (S.T. च्या विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र आवश्यक राहील.)

3 शाळा / महाविद्यालय सोडल्याचा दाखला (T.C.) सत्यप्रत

4 मागील वर्षाची गुणपत्रिका सत्यप्रत (इ. 10 वी पासून सर्व)

5 शिष्यवृत्ती आदेश क्रमांक सोबत जोडावे (मुळप्रत)

6 वडील हयात नसल्यास त्यांच्या मृत्युचा दाखला (सत्यप्रत)

7 शैक्षणिक गॅप असल्यास प्रतिज्ञापत्र जोडावे

8 शिष्यवृत्ती अर्जासोबत आधार कार्ड, बँक पासबुक सत्यप्रत जोडावी.

9 Online From भरताना सर्व दस्तऐवज Upload करणे बंधनकारक.

**टिप : दिलेल्या वेळेत अर्ज बिनचूक भरुन जमा करण्याची जबाबदारी विद्यार्थ्याची राहील.**



# पालकांसाठी सुचना

1 आपल्या पाल्यांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत पालकांनी महाविद्यालयाच्या प्राचार्यांशी अगर वर्ग शिक्षकांशी समक्ष भेटून माहिती घ्यावी.

2 महाविद्यालयातील गैरहजेरी, बेशिस्त वर्तन पालकांनी गंभीर दखल घेऊन ताबडतोब प्राचार्यांशी संपर्क साधावा.

3 पालकांनी स्वताःफी  भरण्याचा प्रयत्न करावा, तसे शक्य न झाल्यास भरलेल्या फिची माहिती पाल्याकडून वेळोवेळी घेत जावी.

4 विद्यार्थी-विद्यार्थिनीनी महाविद्यालयाच्या सर्व नियमांचे काटेकोरपालन करणे आवश्यक आहे. नियमबाह्य वर्तणूक शिस्तीचे उल्लंघन अगर अक्षम्यगुन्हा याबाबत शिक्षा करण्याचा अधिकार प्राचार्यांना आहे.

# परीक्षा संबंधित नियम

1 परीक्षेसंबंधी सर्व सुचना वेळोवेळी सुचना फलकावर पहाव्यात. परीक्षा फॉर्म भरण्यापूर्वी आपणाकडील सर्व फीस भरणे बंधनकारक राहिल त्याशिवाय परीक्षा फॉर्म भरता येणार नाही.

2 महाविद्यालयामार्फत घेतली जाणारी सत्रांत परीक्षा / सहामाही परीक्षा, तसेच सर्व प्रकारचे प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करणे अनिवार्य आहे. अन्यथा परीक्षेस बसता येणार नाही.

3 परीक्षा फॉर्म दिलेल्या विहीत वेळेत भरावा अन्यथा विलंब शुल्क आकारले जाईल. तसेच मुदतीनंतर आलेले परीक्षा फॉर्म स्विकारले जाणार नाही.

# कला, वाणिज्य,विज्ञान व एम.सी.ही.सी कनिष्ठ महाविद्यालय

## 11 वी व 12 वी कला शाखा ( माध्यम - मराठी )

१) **इंग्रजी** (English)
२) **मराठी** (Marathi)
३) **इतिहास** (Histroy)
४) **राजशास्त्र** (Political science)
५) **समाजशास्त्र** (Sociology)
६) **भूगोल** (Geography) **अर्थशास्त्र** Economics)
७) **पर्यावरण शिक्षण** (Environment Edu.)
८) **आरोग्य व शा. शिक्षण** (Health & Phy. Edu.)

## 11 वी व 12 वी वाणिज्य शाखा ( माध्यम - मराठी )

१) **इंग्रजी** (English)
२) **मराठी** (Marathi)
३) **पुस्तपालन व लेखाकर्म** (Bank Keeping & Accountancy)
४) **सचिवाची कार्यपध्दत** (Secretarial Practice)
५) **व्यापार संघटन** (Organisation of Commerce)
६) **अर्थशास्त्र** (Economics)
७) **पर्यावरण शिक्षण** (Enviroment Edu.)
८) **आरोग्य व शा. शिक्षण** (Health & Phy. Edu.)

## 11 वी व १२ वी विज्ञान शाखा ( माध्यम - इंग्रजी)

१) **इंग्रजी** (English)
२) **मराठी** (Marathi)
३) **गणित** ()
४) **भौतिकशास्त्र** (Physics)
५) **रसायनशास्त्र** ()
६) **जीवशास्त्र** (Biology)
७) **पर्यावरण शिक्षण** (Environment Edu.)
८) **आरोग्य व शा. शिक्षण** (Health & Phy. Edu.)

## 11 वी व १२ वी परीक्षा संदर्भातील सुचना व परीक्षआ वेळपत्रक

| | |
|---|---|
| १) ऑगस्ट ४ व ५ वा आठवडा | पहिली घटक चाचणी परीक्षा |
| २) २२ सप्टेंबर ते ३ ऑक्टोंबर | एच.एस.सी. बोर्ड परीक्षा फॉर्म भरणे |
| ३) ऑक्टोंबर २ रा व ३ रा आठवडा | प्रथम सत्र परीक्षा |
| ४) डिसेंबर ४ था व ५ वा आठवडा | दुसरी घटक चाचणी परीक्षा |
| ५) जानेवारी ३ रा व ४ था आठवडा | १२ वी सराव परीक्षा |
| ६) मार्च शेवटचा आठवडा व एप्रिल पहिला आठवडा | ११ वी द्वितीय सत्र परीक्षा |

टिप :- वरील कनिष्ठ महाविद्यालयीन परीक्षेचे वेळापत्रक व सुचना आपणास वर्गात४ दिवसापूर्वी देण्यात येईस. परिस्थितीनुरुप परीक्षेच्या वेळापत्रकात बदल होऊ शकतो.



# महाविद्यालयात राबविले जाणारे उपक्रम

**1) राष्ट्रीय सेवा योजना**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाअंतर्गत महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना हा उपक्रम राबविल्या जातो. राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

1) राष्ट्रीय भावना, राष्ट्राचा प्रेरणादायी इतिहास, वारसा जोपासणे.
2) राष्ट्रीय एकात्मतेची भावना जोपासणे.
3) राष्ट्रीय प्रेरणाशक्ती व श्रध्दास्थाने असणाऱ्या व्यक्तीबद्दल अभिमान व आदर निर्माण करावे.
4) समाजसेवेंसाठी विद्यार्थ्यांच्या मनामध्ये सामाजिक कार्याची आवड निर्माण करणे.
5) श्रमाची प्रतिष्ठा जोपासणे
6) सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी जाती, धर्म पंथ, लिंग, वर्ण इ. भेद नष्ट करणे.
7) संघटन शक्तीचे महत्व वाढीस लावणे.
8) विद्यार्थी व विद्यार्थीनी यांच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करणे.

**2) स्काऊट गाईड प्रशिक्षण**

1) विद्यार्थ्यांना स्वयंशिस्त लावणे
2) विद्यार्थ्या मधील सुप्त गुणांचा विकास करणे.
3) विद्यार्थ्या मधील अंतर्गत कौशल विकास साधणे.

**3) विद्यार्थ्यांचा सुप्त गुणांचा विकास :**

विद्यार्थ्यांमधील सुप्त कला गुणांना वाव देवून त्यांच्या व्यक्तिमत्व विकासात प्राधान्य देण्याचा प्रयत्न महाविद्यालया तर्फे स्पर्धाच्या माध्यमातून करण्यात येईल.

1) क्रीडा, वादविवाद / निबंध / वत्तृत्व, भितीपत्रके इत्यादी स्पर्धा.
2) नियतकालिकांमध्ये विद्यार्थ्यांच्या कविता व लेख प्रसिध्द करण्यात येईल.
3) विद्यापीठ व शासन यांच्या निर्देशा प्रमाणे विविध उपक्रम व कार्यक्रमाच्या माध्यमातून गुणवंत **विद्यार्थी घडविण्याचा कॉलेजचा संकल्प आहे.**

**4) वार्षिक स्नेहसंमेलन :**

वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये नाटक, संगीत, नृत्य,कला, गाणी, विविध वेषभुषा, आनंदनगरी, खेळांचे सामने, वादविवाद स्पर्धा, भितीपत्रके, रांगोळी स्पर्धा इ. स्पर्धांचे आयोजन केले जाईल. यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिसे व प्रमाणपत्राचे वाटप करण्यात येईल.

**5) विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन केंद्र :**

महाविद्यालयातील व परिसरातील ग्रामीण विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी कॅम्पस इन्टरव्हयु चे आयोजन करण्यात येईल.

**6) विविध क्रिडा स्पर्धा**

1) खो-खो, कबड्डी, हॉलीबॉल, क्रिकेट, बास्केटबॉल, अशा मैदानी स्पर्धांचे आयोजन केले जाते.
2) खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो.